**MHRT010009652024**

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६१/२०२४ मधील नि.७ वरील आदेश.</u>

| | | |
|---|---|---|
| श्री.सुनिल राजाराम खराडे | | अर्जदार |
| <u>विरुध्द</u> | | |
| सौ.गणेशी सुनिल खराडे | | सामनेवाली |

१. अर्जदाराने सदरचा अर्ज आपली पत्नीचे विरुध्द त्याचा अज्ञान मुलगा रुद्रचा ताबा उन्हाळी सुट्टी, नाताळा तसेच अन्य सुट्टीचे कालावधीत मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. या अर्जाची थोडक्यात पार्श्वभुमी खालीलप्रमाणे–

अर्जदार व सामनेवाली हे नात्याने पती–पत्नी असुन त्याचा विवाह दि.२३/०३/२००८ रोजी झालेला आहे. या विवाह संबंधातुन त्यांना रुद्र हा मुलगा झाला. अर्जदार व सामनेवाली यांच्यामधील कौटुंबिक वादामुळे सामनेवाली तिच्या माहेरी दि.०८/०८/२००८ निघुन गेली होती. परंतु अर्जदाराने सामनेवाली हिला मध्यस्थामार्फत तिला पुन्हा नांदण्यासाठी आणले होते. त्यानंतर अर्जदार व सामनेवाली हे माहे जुन २०२१ पासुन विभक्त राहत आहेत. अर्जदाराने यापुर्वी मुलाचा ताबा मिळण्यासाठी गार्डीयन ॲण्ड वॉर्डस ॲक्टचे कलम ७ आणि २५ अन्वये दाखल केला होता. परंतु अर्जदार व सामनेवाली

यांच्या दरम्यान काही बोलणी झाल्यामुळे अर्जदाराने सदरहु अर्ज काढुन घेतला. परंतु अर्जदारास सामनेवाली मुलास भेटु देत नसल्यामुळे तसेच मुळ अर्ज चालुन निकाली होण्यास बराच कालावधी जाणारा आहे. त्यामुळे सुट्टीच्या दरम्याने मुलाला भेटण्याच्या माफक इच्छेने अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सामनेवालीने या अर्जास नि.१३ वर जबाब दाखल केला असुन त्यात अर्जात केलेले सर्व आरोप तिने नाकारले आहेत. तिचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, तिच्यावर दबाव आणण्यासाठी अर्जदाराने हा अर्ज केला आहे. अर्जदार म्हणतो त्याप्रमाणे रुद्र कधीही त्याच्याकडे रहावयास नव्हता. तो नेहमी सामनेवाली सोबतच रहायचा. तिला अशी खात्रीशीर माहिती मिळाली आहे की, तिचे सोबत वैवाहिक संबंध संपुष्टात आलेले नसताना अर्जदार दुसऱ्या पत्नी सोबत एकत्रात राहतो आणि तिच्यापासुन त्याला एक मुलगा आहे. तिने रुद्र याच्या शैक्षणिक प्रवेशासाठी प्रयत्न सुरु केले असुन थोडया दिवसांतच प्रवेश मिळणार आहे. अर्जदाराला दारु, तंबाखु, गुटख्याचे व्यसन आहे. रुद्र त्याच्या सोबत राहिल्यास तो व्यसनाधीन होईल. सामनेवालीचे फार्मासी पर्यंत शिक्षण झालेले असुन तिने अनेक ठिकाणी नोकरी मिळवायचा प्रयत्न केला. परंतु अर्जदार तिचे नोकरीचे ठिकाणी शिवीगाळी आणि दमदाटी देतो म्हणुन तिला कोणीही नोकरीवर ठेवायला तयार नाही. सामनेवाली हिचे शिक्षण फार्मासी पर्यंत झालेले असुन ती वैद्यकिय व्यवसायामध्ये कार्यरत होती. अशा परिस्थितीत रुद्र तिच्याकडे राहिल्यास त्याचे भवितव्य उज्वल होणार आहे. अशा परिस्थितीत अर्जदाराने दाखल केलेला अर्ज खर्चासह नामंजुर व्हावा.

४. प्रस्तुत प्रकरणात खालील मुददे विचारार्थ उपस्थित होतात व त्याची कारणे पुढील प्रमाणे दिली आहेत.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्जदार हा अज्ञान मुलगा कु.रुद्र याचा ताबा उन्हाळी सुट्टी, नाताळा तसेच अन्य सुट्टीचे कालावधीत मिळण्यास पात्र आहे का ? | होकारार्थी |
| २) | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## युक्तीवाद

५. अर्जदाराच्या वकिलांनी युक्तीवादात असे सांगितले की, सामनेवाली रुद्र यास अर्जदाराकडे ठेवण्यास तयार झाली होती. त्यासाठी तिने २५,०००/– रुपयाची मागणी केली होती. तसेच पोलीसांची धमकी दिली होती. ती मुलाला सांभाळण्यास सक्षम नाही म्हणुनच ती त्याला दुसऱ्याच्या घरात ठेवते त्याचा पुरावा म्हणुन त्याचे फोटो या प्रकरणात दाखल केले आहेत. अर्जदार मुलाच्या शाळेची फी भरतो त्याची पावती या प्रकरणात दाखल केली आहे. मुलगा त्याच्याच ताब्यात होता. मुलाला त्याचा लळा लागलेला आहे. त्याच्या शिक्षणाची सोय त्याने केलेली आहे. कोर्टात सामनेवालीच्या हजेरीत मुलाला त्याला भेटणे शक्य होत नाही. सबब त्याला अर्जदाराच्या एक दिवस ताब्यात देण्यात यावे.

६. सामनेवालीच्या वकिलांनी युक्तीवादात असे सांगितले की, रुद्र सामनेवालीच्या ताब्यात आहे. त्याला थोडया वेळासाठी दुसरीकडे ठेवल्यामुळे ती त्याला

सांभाळण्यासाठी सक्षम नाही असे होत नाही. अर्जदाराने त्याचा पुर्वी दि.०३/०४/२०२४ रोजी दाखल केलेला अर्ज कोणत्याही कारणाविना दि.२६/०९/२०२४ रोजी काढुन घेतला आहे. त्याला रुद्रला जिल्हा विधी सेवा कार्यालयामध्ये भेटता येत आहे. तेथे कुठलेही दहशतीचे वातावरण नव्हते. त्याने पुर्वीच घटस्फोट मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्यानंतर त्याने मुलाचा ताबा मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्यावरुन त्याचा हेतु स्पष्ट आहे की, सामनेवालीवर दबाव टाकुन घटस्फोट मिळवावा. सामनेवाली दि.२१/०६/२०२१ पासुन विभक्त राहत आहे. तेव्हापासुन मुलाचे पालनपोषण करण्यासाठी त्याने काय प्रयत्न केले ते त्याने अर्जात कोठेही लिहिले नाही. सामनेवालीला स्वतःच्या व मुलाच्या उध्दरनिर्वाहासाठी नोकरी करावी लागते. मध्यस्था पुढे प्रकरण पाठविले असता मुलाला ॲडमिशन घेऊन देतो म्हणाला पण पुढे काही केले नाही. तो डी.व्ही.प्रकरणात येत नाही. मुलाच्या पालनपोषणासाठी चौकशी करीत नाही, पैसे देत नाही. त्याची वर्तणुक ही काळजी घेणारा पिता अशा स्वरुपाची नाही. मुलाच्या भविष्याचे त्याला काही पडलेले नाही. घरात मुलाची काळजी कोण घेणार आहे, तो मुलासाठी कसा वेळ देणार आहे याबाबत काहीही सांगितलेले नाही. मुलाच्या भवितव्यासाठी व कल्याणासाठी काय करीत आहे याचा उल्लेख त्याने कोठेही केलेला नाही. कोर्टाने ठरविलेल्या वेळी त्याला मुलास भेटु दिले होते. तो मुलाला ताब्यात ठेवुन लांब जावुन बसतो. कोर्टाच्या स्टाफला त्रास देतो, त्यांच्याशी उध्दट बोलतो. अशा सर्व परिस्थितीत रुद्रची शाळा सोमवार ते शुक्रवार सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत असते. शनिवार व रविवार त्याला सुट्टी असते. या सर्व बाबींचा विचार करुन अर्जदाराला रुद्रला भेटण्यासाठी योग्य ती वेळ ठरविण्यात यावी.

## कारणमिमांसा

**मुद्दा नं. १ व २ –**

**७.** अर्जदार हा रुद्रचा जन्मदाता पिता आहे. आजमितीस रुद्र जरी सामनेवाली म्हणजेच त्याच्या जन्मदाती आईच्या ताब्यात असला तरी त्याला वडीलांचे प्रेम, माया मिळण्याचा अधिकार आहे. अर्जदाराला रुद्रला भेटु न देण्यासारखे, सुट्टीत ठरावीक दिवस ताब्यात न देण्याचे कोणतेही संयुक्तीक कारण सामनेवालीला या अर्जाचे युक्तीवादात दाखवुन देता आलेले नाही. अर्जदार व सामनेवाली दोघेही रत्नागिरी येथे राहत आहेत. रुद्रची शाळा दुपारी ३.०० वाजता संपते. या सर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. रुद्रला दर बुधवारी ४ ते ६ या वेळेत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यालयात सामनेवालीने भेटु दयावे. एखादया बुधवारी कोर्टाला सुट्टीचा दिवस असल्यास दुसऱ्या दिवशी भेटण्यासाठी आणावे.

३. रुद्रला वडिलासोबत दोन महिन्यातुन एकदा सिनेमा, मनोरंजन खेळासाठी किंवा बागेत २ ते ३ तास घेवुन जाण्यासाठी सामनेवालीने अर्जदारा बरोबर जावु दयावे. आवश्यक वाटल्यास तिने सुध्दा त्याच्या सोबत जावे. दिवाळी, नाताळ सुट्टीमध्ये तसेच महिन्यातील सतत आठ दिवसांपेक्षा जास्त कालावधीची सुट्टी असल्यास रुद्रला अर्जदाराच्या ताब्यात दोन दिवस दयावे. अर्जदाराने रुद्रला ताब्यात घेण्यापुर्वी तो किती तारखेला त्याला परत

सामनेवालीच्या हवाली करेल व कोठे करेल याचे लेखी हमीपत्र कोर्टाचे प्रतिनिधी श्री.बारगुडे यांना सादर करावे.

४. जिल्हा विधि सेवा प्राधिकरण यांच्या कार्यालयातील श्री.अमित बारगुडे, कनिष्ठ लिपीक यांनी त्याच्या भेटी संदर्भासाठी योग्य ती देखरेख ठेवावी आणि दोन्ही पक्षकारांनी आवश्यक ते सहकार्य करावे.

५. दोन्ही पक्षकारांनी या आदेशाचे पालन न केल्यास त्याची अंतिम आदेश करताना योग्य ती दखल घेतली जाईल याची उभय पक्षांनी नोंद घ्यावी.

(कोर्टासमोर जाहीर केला)

SUNIL SHRIDHAR GOSAVI

Digitally signed by SUNIL SHRIDHAR GOSAVI
Date: 2025.02.06 12:11:38 +0530

रत्नागिरी (एस.एस.गोसावी)

दिनांक – ०३/०२/२०२५ प्रमुख जिल्हा न्यायाधीश,

रत्नागिरी.

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Civil Misc. Appln. No. | :- | 61/2024. |
| Name of Stenographer | :- | Smt.N.S.Desai. |
| Court Name | :- | District Court, Ratnagiri. |
| Date of Decision | :- | 03/02/2025 |
| Order signed by P.O. on | :- | 03/02/2025 |
| Judgment uploaded on | :- | 03/02/2025 |

सबब रुद्रला दर बुधवारी ४ ते ६ या वेळेत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यालयात सामनेवालीने भेटु दयावे. एखादया बुधवारी कोर्टाला सुट्टीचा दिवस असल्यास दुसऱ्या दिवशी भेटण्यासाठी आणावे. ज्या दिवशी अर्जदाराला सामनेवालीला रुद्रला भेटण्यासाठी आणणे शक्य नसल्यास त्यादिवशी तिने अर्जदाराला फोन करुन त्याची अगोदर कल्पना दयावी व त्या आठवडयात कोणत्याही दिवशी भेटण्यासाठी आणणार आहे याची स्पष्ट कल्पना दयावी. अर्जदाराला ज्या आठवडयात त्याला एखादया कारणामुळे रुद्रला भेटणे शक्य नसल्यास त्यावेळी त्याने सामनेवालीला फोन करुन अगोदर कल्पना दयावी. रुद्र भेटी संदर्भासाठी सामनेवालीने हजर रहावे. जिल्हा विधि सेवा प्राधिकरण यांच्या कार्यालयातील अमित बारगुडे, कनिष्ठ लिपीक यांनी त्याच्या भेटी संदर्भासाठी योग्य ती देखरेख ठेवावी आणि दोन्ही पक्षकारांनी आवश्यक ते सहकार्य करावे. दोन्ही पक्षकारांनी आपल्या काही अडचणी असल्यास त्यानाही कळवावे. तथापि, दोन्ही पक्षकारांनी संबंधित लिपीकाशी उध्दट वर्तन केल्यास त्याच्या वर्तनाची योग्य ती दखल अंतिम आदेश करताना घेतली जाईल याची नोंद घ्यावी. रुद्रला वडिलासोबत दोन महिन्यातुन एकदा सिनेमा, मनोरंज खेळासाठी बागेत घेवुन जाण्यासाठी सामनेवालीने अर्जदारा बरोबर जावु दयावे, आवश्यक वाटल्यास तिने सुध्दा त्याच्या सोबत जावे. दिवाळी, नाताळ सुट्टीमध्ये तसेच महिन्यातील सतत आठ दिवस सुट्टी असल्यास रुद्रला अर्जदाराच्या ताब्यात दोन दिवस दयावे. अर्जदाराने रुद्रला ताब्यात घेण्यापुर्वी तो किती तारखेला त्याला परत सामनेवालीच्या हवाली करेल व कोठे करेल याचे

लेखी हमीपत्र कोर्टाला सादर करावे. त्यानंतर तो मुलाला ताब्यात घेईल. त्याने या हमीपत्राचे पालन न केल्यास त्याच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल. अशा परिस्थितीत